सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
GOVERNMENT POLYTECHNIC, MIRAJ
Near Maji Sainik Vasahat, Vidanagar, Miraj-416 410.
Telephone No. Office (0233) 2231423 Office (0233) 2231269
Email : gpmiraj@gmail.com Website : www.gpmiraj.ac.in

# Elaboration of Vision of Institute

## Vision of Institute

**To develop technologically competent industry-ready technicians having high values and national concern.**

(The Institute vision statement portraits a wishful future picture of its product – i.e. a technician as viewed by the Institute staff)

The underpinning content behind the keywords of the vision statement can be elaborated as follows:

1. **Technicians:**
   A technician is a technically competent person who works as a mediator between an engineer and a skilled worker. The technician has an executional and supervisory role in the industry. Whereas Engineering Colleges (including IITs and NITs) produce Engineers and ITI's produce skilled workers for industry, Polytechnic Institutes are supposed to produce technicians.

2. **Technologically competent:**
   As per outcome based education approach, a technician is expected to have acquired the technological competencies indicated precisely in the statements called Program Educational Objectives (PEOs) of the respective program. The PEOs are expected to be acquired by the technician after attainment of the Program Outcomes (POs) and Program-specific Outcomes (PSOs) while passing out of the Institute.

3. **Industry-ready:**
   Even a 'technologically competent' technician needs to be made 'industry-ready' by the inclusion of organization soft skills like leadership qualities, communication skills, problem-solving techniques, teamwork as well as some special competencies so that his/her technological competency becomes ready to use for the industry on the floor / fieldwork.

4. **High values**:
   Imply generic ethical character without which technician cannot be useful to the industry. In fact, in absence of high moral values (honesty, respect, responsibility, service, loyalty, etc.), technological competencies can become harmful to the national wellbeing.

5. **National concern:**
   Implies that the technician has the commitment and urge for providing his / her services for the development of the nation to make the nation industrially prosperous and self-reliant. It also includes means concern about social responsibilities, environmental issues etc.

*****

# Elaboration of Mission of Institute

## Mission of Institute

1. **To develop intellectual competency and a life-long learning attitude through the teaching-learning process.**

   Intellectual competencies include the knowledge and thinking-related abilities of the technician. Lifelong learning is a competency by which the technician will be able to self-learn newer technologies on his own whenever required throughout the career span. Teachers will be trained for modern pedagogical approaches to develop intellectual competencies so as to develop the above in the student.

2. **To inculcate technical skills through effective experimental work and industrial exposure.**

   Technical skills include the psychomotor skills of operating equipment and experimentation while actually working in the industry. Emphasis on effective hands-on practical's and industrial exposure will be given based on modern training approaches. Industrial exposure is a strategy where a diploma technician is put through real-life work situations.

3. **To encourage entrepreneurship and preserve the environment.**

   The technicians developed by the institute will be systematically encouraged to become self-employed as entrepreneurs with their own start-ups, i.e. the act of starting a new business venture, or a new commercial or industrial project. Awareness and encouragement will also be provided to technicians for the preservation of the environment by systematic programs. Preservation of environment includes maintaining, protecting or keeping environment improper existence.

4. **To instill professional and moral values and national concern through academic ambiance.**

   Specific measures will be devised and implemented for instilling moral values, professional skills and national concern in the technicians. In order to make the technological competencies of the technicians effective on actual work and to lead to a positive contribution to the industrial prosperity of the nation, professional and moral values are necessary. The values include character, work ethics, responsibility, integrity, honesty, reliability, adaptability, accountability and self-motivation. National concern means concern about social responsibilities, environmental issues and prosperity of the nation. Academic ambience implies inspiring and motivating academic environment in the institute.

*****

# संस्थेच्या ध्येयप्रणालीबाबतचे विवेचन

## संस्थेचे ध्येयवाक्य

संस्थेचे ध्येयवाक्य - उच्च नीतीमूल्ये व राष्ट्रीय संवेदना असलेले उद्योगाभिमुख सक्षम तंत्रज्ञ विकसित करणे.
(संस्थेचे ध्येयवाक्य हे संस्थेमधून बाहेर पडणारा तंत्रज्ञ कसा असावा हयाबद्यल संस्थेच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाने रंगवलेले भविष्यातील चित्र होय)

### ध्येयवाक्यांमध्ये अभिप्रेत असणाऱ्या सूचक शब्दांचे विस्तृतीकरण खालीलप्रमाणे -

1. **तंत्रज्ञ**
   तंत्रज्ञ हा तांत्रिकदृष्टया सक्षम व्यक्ती असून तो अभियंता आणि कुशल कारागिर हयांमधील दुव्याचे काम करतो. उद्योगक्षेत्रात तंत्रज्ञाची भूमिका ही कार्यान्वयी तसेच पर्यवेक्षी असते. उद्योगक्षेत्रासाठी अभियांत्रिकी महाविद्यालये अभियंते तर तंत्रनिकेतने तंत्रज्ञ घडवतात.

2. **तांत्रिकदृष्टया सक्षम**
   निष्पन्नाधारित शिक्षण पध्दतीनुसार संबंधित शाखेतील विशिष्ट शाखानिहाय शैक्षणिक उद्यिष्टांची पूर्तता करताना तंत्रज्ञाने तांत्रिक योग्यता अचूकपणे संपादन करणे अपेक्षित आहे. त्यासाठी संस्थेतून उत्तीर्ण होतांना, विद्यार्थी / विद्यार्थीनीने विशिष्ट समाईक फलिते व शाखानिहाय विशिष्ट फलिते प्राप्त करणे अपेक्षित आहे.

3. **औदयोगिकदृष्टया उपयुक्त**
   तांत्रिकदृष्टया सक्षम तंत्रज्ञाला औदयोगिकदृष्टया उपयुक्त व प्रभावी बनविण्यासाठी तरल कौशल्य विकासाची जोड देणे आवश्यक असते. नेतृत्वगुण, संभाषणकला, समस्यांचे निराकरण, सांघिक कौशल्य अशा आणि इतर अनेक विशेष क्षमतांच्या समावेशाने तांत्रिकदृष्ठया सक्षम तंत्रज्ञ उद्योगक्षेत्रात कार्य करण्यास प्रभावी बनतो.

4. **उच्च नीतीमूल्ये**
   नैतिक मूल्ये अंगीकृत केल्याशिवाय तंत्रज्ञ उदयोगजगताकरीता उपयुक्त ठरत नाही. खरे तर, उच्च नीतीमूल्यांच्या (जसे प्रामाणिकपणा, आदर, जबाबदारीची जाणीव, निष्ठा इ.) अभावी तांत्रिक सक्षमता ही राष्ट्रीय उत्कर्षास मारक ठरु शकते.

5. **राष्ट्रीय संवेदना**
   ही बाब तंत्रज्ञास देशाबद्यल असलेली बांधिलकी आणि देशाच्या विकासाकरीता हातभार लावण्याची भावना व इच्छाशक्ती दर्शविते. देशाची औद्योगिक प्रगती आणि संविधानांतर्गत अभिप्रेत असणारी आत्मनिर्भरता निर्माण करणे, सामाजिक जबाबदारी, पर्यावरणाप्रती जागरुकता अशा बाबींचा अंतर्भाव हयामध्ये होतो.

****

# संस्थेच्या ध्येयप्रणालीबाबतचे विवेचन

# संस्थेची ध्येयप्रणाली

1. **अद्ययावत शिक्षण प्रक्रियेमधून बौध्दिक अधिक्षमता व निरंतर शिकण्याची वृत्ती जोपासणे.**
   तंत्रज्ञांच्या बौध्दिक योग्यतेअंतर्गत ज्ञान आणि वैचारिक क्षमतांचा समावेश होतो. " आजन्म स्वयं शिक्षणाचा दृष्टीकोन " ही एक अशी क्षमता आहे की, ज्यानुसार तंत्रज्ञ त्याच्या कारकीर्दीच्या कालावधीत नवीन तंत्रज्ञान स्वत: शिकत राहील. विद्यार्थ्यांत बौध्दिक योग्यता विकसित करण्यासाठी अध्यापकांना आधुनिक शैक्षणिक दृष्टीकोनाबाबत प्रशिक्षण दिले जाईल.

2. **प्रयोगशीलता व औद्योगिक साहचर्य हयातून तांत्रिक कौशल्ये बिंबवणे.**
   उदयोगक्षेत्रात काम करतांना उपकरणांची हाताळणी आणि प्रयोग करण्याची वृत्ती हयांचा समावेश तांत्रिक कौशल्यात होतो. औदयोगिक साहचर्य हे एक असे धोरण आहे की जिथे तंत्रज्ञ हा प्रत्यक्ष उद्योगविश्वाच्या कामाच्या परिस्थितीतून जातो.

3. **उद्योजकतेला प्रोत्साहन देणे व पर्यावरण रक्षणाची जाणीव वृध्दिंगत करणे.**
   संस्थेने विकसित केलेल्या तंत्रज्ञांना उदयोजक म्हणून त्यांचा स्वत:चा व्यवसाय सुरु करण्यासाठी पध्दतशीरपणे प्रोत्साहित केले जाईल. (जसे स्वयंरोजगार, नवीन व्यावसायिक अथवा औदयोगिक उपक्रम) तंत्रज्ञांना पध्दतशीर कार्यक्रमाद्वारे पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागृत तसेच प्रोत्साहितही केले जाईल. पर्यावरण जतन करणे यात पर्यावरणाचे योग्य अस्तित्व राखणे, संरक्षित करणे आणि निगा राखणे समाविष्ट आहे.

4. **संस्थेतील पोषक शैक्षणिक वातावरणाद्वारे नीतीमूल्ये, व्यावसायिकता व राष्ट्रीय संवेदना वाढीस लावणे.**
   तंत्रज्ञांमध्ये नीतीमूल्ये, व्यावसायिकता आणि राष्ट्रीय संवेदना वाढीस लावण्यासाठी विशिष्ट उपाययोजना आखून त्या अंमलात आणल्या जातील. देशाच्या औद्योगिक क्षेत्रातील भरभराटीसाठी तसेच तंत्रज्ञांच्या तांत्रिक क्षमता प्रभावी करण्यासाठी व्यावसायिकता तसेच नीतीमूल्ये आवश्यक असतात. त्यात चारित्र्य, कार्यनैतिकता, जबाबदारीची जाणीव, प्रामाणिकपणा, विश्वासार्हता, विश्वसनीयता आणि स्वयंप्रेरणा हयांचा समावेश होतो. राष्ट्रीय संवेदना म्हणजे सामाजिक जबाबदारी, पर्यावरणीय समस्या आणि राष्ट्राच्या समृध्दीची जाणीव यासाठी पोषक असे प्रेरक शैक्षणिक वातावरण संस्थेत विकसित केले जाईल.

****